॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१४ ( ) उदयपूर (राजस्थान) येथे झालेल्या पाच राज्यांच्या पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला दोन पारितोषिके प्राप्त झाली.

९ ते १२ जानेवारी या कालावधीत उदयपूर येथे पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धा झाली. यामध्ये महाराष्ट्र, गुजरात, गोवा, राजस्थान, मध्यप्रदेश या पाच राज्यांमधील विद्यापीठांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. सामाजिकशास्त्र विषयाच्या गटात पदवी स्तरावरील प्रथम पारितोषिक मनिषा चौधरी (गरुड महाविद्यालय, शेंदूर्णी) या विद्यार्थिनीला मिळाले. तिने महिलांसाठी बहुपयोगी सुरक्षित बाटली तयार केली असून या संशोधनाला प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. विज्ञान विषयात पदव्युत्तर पदवी गटात विद्यापीठाच्या भौतिकीयेशास्त्र प्रशाळेचा विद्यार्थी शुभव पाटील याने द्वितीय पारितोषिक प्राप्त केले. त्याने हिअरींग गॅझेट तयार केले आहे.

विद्यापीठाच्या या लक्षणीय यशाबद्दल कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते या दोन्ही विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरु पी.पी.माहुलीकर, कुलसचिव भ.भा.पाटील, प्रा.एस.टी.इंगळे, प्रा.भूषण चौधरी, प्रा.कीर्ती कमलजा हे उपस्थित होते.

---

जा.क्र.कबचौउमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांकः- १४ जानेवारी, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

( डॉ.सुनील पाटील )

जनसंपर्क अधिकारी